# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.05.2026** **वारः सोमवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदींना स्वीडनचा सर्वोच्च सन्मान प्रदान
2. भारत-नॉर्डिक शिखर परिषदेसाठी पंतप्रधान मोदी आज नॉर्वे दौऱ्यावर
3. काँग्रेस नेते व्ही.डी.सतीशन केरळचे मुख्यमंत्री म्हणून आज शपथ घेणार आणि
4. 52 व्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत महेंद्र गायकवाड विजयी, तर महिला हिंदकेसरीचा किताब हरियाणाच्या काजल धोंजक ला प्रदान

**<u>मोदी-स्वीडन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नेदरलँड्सचा दौरा आटोपून, आपल्या पाच देशांच्या दौऱ्याच्या तिसऱ्या टप्प्यासाठी काल संध्याकाळी स्वीडनमधल्या गोथेनबर्ग इथं दाखल झाले. स्वीडनचे पंतप्रधान उल्फ क्रिस्टरसन यांनी त्यांचं स्वागत केलं. पंतप्रधान मोदींना विमानतळावर औपचारिक मानवंदना अर्थात 'गार्ड ऑफ ऑनर' देण्यात आला.या दौऱ्यात भारत आणि स्वीडन यांच्यातील द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंचा आढावा घेण्यात येत असून व्यापार, हरित संक्रमण,कृत्रिम बुद्धिमत्ता, उदयोन्मुख तंत्रज्ञान, स्टार्टअप्स,संरक्षण, अंतराळ आदी क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या नवीन संधी शोधण्याची अपेक्षाही दोन्ही बाजूंनी व्यक्त करण्यात आली.

द्विपक्षीय संबंधांमधील पंतप्रधान मोदी यांच्या योगदानाबद्दल आणि त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाबद्दल पंतप्रधान मोदींना स्वीडनचा सर्वोच्च सन्मान, 'रॉयल ऑर्डर ऑफ द पोलर स्टार, डिग्री कमांडर ग्रँड क्रॉस' प्रदान करण्यात आला.

स्वीडिश कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी झालेल्या संवादादरम्यान, पंतप्रधानांनी 'मेक इन इंडिया' आणि 'मेड विथ स्वीडन' उपक्रमांमध्ये, विशेषतः 'राष्ट्रीय हरित हायड्रोजन' आणि 'महत्त्वाच्या खनिजां'शी संबंधित मोहिमांमध्ये, अधिक गुंतवणुक करण्याचं आवाहन केलं.

यावेळी झालेल्या बैठकीत युवराज्ञी व्हिक्टोरिया यांनीही सहभाग घेतला आणि स्वीडनचे राजे आणि राणी यांच्यावतीनं शुभेच्छा दिल्या.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या यजमानांनी केलेल्या आत्मीय स्वागताबद्दल त्यांचे आभार मानले आणि राजे कार्ल सोळावे गुस्ताव यांना त्यांच्या 80 व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

या दौऱ्यात दोन्ही पंतप्रधान युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन यांच्यासह 'युरोपियन राउंड टेबल फॉर इंडस्ट्री'ला संयुक्तपणे संबोधित करणार आहेत.

दरम्यान, नेदरलँडच्या दौऱ्याबद्दल समाजमाध्यमावरील संदेशात मोदी म्हणाले की त्यांच्या नेदरलँड्स भेटीमुळे द्विपक्षीय संबंधांना नवी गती मिळाली असून दोन्ही देशांनी संबंधांना धोरणात्मक भागीदारीपर्यंत नेऊन आणि जलस्रोत, सेमीकंडक्टर, नवोपक्रम, संरक्षण, शाश्वतता आणि गतिशीलता या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवून भविष्यासाठी एक महत्त्वाकांक्षी आराखडा तयार केला आहे.

**<u>मोदी-नॉर्वे</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज तिसऱ्या 'भारत-नॉर्डिक शिखर परिषदे'साठी आणि द्विपक्षीय भेटीगाठींसाठी नॉर्वेला पोहोचतील. पंतप्रधान मोदींचा हा नॉर्वेचा पहिलाच दौरा असेल; या दौऱ्यात ते नॉर्वेचे राजे हॅराल्ड पाचवे आणि राणी सोन्या यांची भेट घेतील, तसंच पंतप्रधान जोनास गहर स्टोअर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील.

**गोयल**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्वीडनचा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं आहे. हा राष्ट्रीय अभिमानाचा क्षण असून पंतप्रधानांना प्राप्त झालेला हा 31वा आंतरराष्ट्रीय सन्मान आहे, असं गोयल यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे.

**केरळ मुख्यमंत्री**

काँग्रेस नेते व्ही. डी. सतीशन आज केरळचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. आजच्या शपथविधी सोहळ्यापूर्वी, भावी मुख्यमंत्र्यांनी काल संध्याकाळी नवनिर्वाचित यूडीएफ सरकारच्या मंत्रिमंडळातील 21 सदस्यांची नावं घोषित केली. या 21 मंत्र्यांपैकी, 14 जणांना पहिल्यांदाच मंत्रीपद मिळालं आहे. संपूर्ण यूडीएफ मंत्रिमंडळ एकत्रितपणे शपथ घेईल, असं सतीशन यांनी राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांच्याकडे मंत्र्यांची यादी सादर केल्यानंतर मंत्रिमंडळाची घोषणा करताना सांगितलं.

सतीशन यांनी काल विधानसभेचे नवीन अध्यक्ष आणि उपाध्यक्षांचीही नावं जाहीर केली.

**दिल्ली मुख्यमंत्री**

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी काल दिल्लीतील द्वारका विधानसभा मतदारसंघात, सुमारे 100 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन केलं. या प्रकल्पांमध्ये विविध भागांतील रस्त्यांची दुरुस्ती, बांधकाम,जलनिस्सारण व्यवस्था बळकट करण्यासाठीची कामं, तसंच उद्यानांचं सुशोभीकरण आणि हरित विकास यांचा समावेश आहे.हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या भागातील पाणी साचणे, खराब रस्ते, गटारांचे पाणी तुंबणे आणि वीजपुरवठा यांसारख्या समस्यांमध्ये लक्षणीय सुधारणा होईल,तसंच नागरिकांना अधिक सुरक्षित,स्वच्छ आणि सोयीस्कर वातावरण लाभेल,असं मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सांगितलं आहे.

**दिल्ली पोलिस**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या उपाययोजना आणि इंधन वापर कपातीच्या आवाहनाच्या पार्श्वभूमीवर,दिल्ली पोलिसांनी आपल्या कार्यालये आणि विविध विभागांमध्ये सरकारी वाहनांच्या वापराचे सुसूत्रीकरण करण्याबाबत, तसेच इंधनाचा वापर कमी करण्याच्या उपाययोजनांविषयी एक परिपत्रक जारी केलं आहे. या परिपत्रकानुसार, दिल्ली पोलिसांच्या सर्व विभागांना आणि कार्यालयांना अनावश्यक वाहन-वाहतूक कमी करण्यासाठी, उपलब्ध वाहनांचा वापर अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी आणि इंधनाचा वापर काटकसरीने करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रभावी पावलं उचलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**चिंता**

संयुक्त अरब अमिरातीमधल्या 'बराका' अणुऊर्जा प्रकल्पाला लक्ष्य करून करण्यात आलेल्या हल्ल्याबाबत भारतानं तीव्र चिंता व्यक्त केली आहे. अशा प्रकारच्या कृती अस्वीकार्य असून त्या धोकादायक आहेत, असं सांगत तातडीनं संयम राखण्याचं, तसंच संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या मार्गावर परतण्याचं आवाहन परराष्ट्र मंत्रालयानं केलं आहे.

**गृहमंत्री-छत्तीसगड दौरा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह काल संध्याकाळी दोन दिवसांच्या छत्तीसगड दौऱ्यासाठी रायपूर इथं दाखल झाले.या दौऱ्यादरम्यान अमित शाह रायपूर आणि बस्तर इथल्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होतील.

दौऱ्याच्या पहिल्या दिवशी गृहमंत्री अमित शाह आज सकाळी रायपूर इथं 'डायल-112' (Dial-112) या आपत्कालीन प्रतिसाद सेवेअंतर्गत नवीन वाहनांना हिरवा झेंडा दाखवून रवाना करतील. त्यानंतर, ते बस्तर जिल्ह्यातील नेतानार गावात एका 'सार्वजनिक सुविधा केंद्रा'चं उद्घाटन करतील. तर दुपारी, जगदलपूर इथल्या 'बादल अकादमी'मध्ये हुतात्म्यांचे कुटुंबीय, सुरक्षा दलाचे जवान, नक्षलवादी हिंसाचारानं बाधित झालेले नागरिक आणि विविध स्थानिक समुदायांचे प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधतील.

तर उद्या 19 मे रोजी जगदलपूर इथं होणाऱ्या 'केंद्रीय क्षेत्रीय परिषदे'च्या 26 व्या बैठकीचं अध्यक्षस्थान गृहमंत्री अमित शाह भूषवतील. या बैठकीला छत्तीसगड, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहतील. छत्तीसगड राज्य 'नक्षलमुक्त' घोषित झाल्यानंतर शाह यांचा हा राज्याचा पहिलाच दौरा आहे.

**नड्डा**

79 व्या जागतिक आरोग्य परिषदेत सहभागी होण्यासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा स्वित्झर्लंडमध्ये दाखल झाले आहेत. सहा दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाची सुरुवात आज जिनिव्हा इथं होणार आहे. या परिषदेची यंदाची मध्यवर्ती संकल्पना 'जागतिक आरोग्याला नवा आकार देणे: एक सामायिक जबाबदारी' अशी असून ही संकल्पना जागतिक आरोग्य आव्हानांचा सामना करण्यासाठी सामूहिक कृतीचं महत्त्व अधोरेखित करते,असं नड्डा यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**पब्लिक स्पीक**

आमच्या पब्लिक स्पीक या थेट फोन-इन कार्यक्रमात आज आम्ही तुमच्यासाठी, 2027 च्या जनगणनेचा सध्या सुरू असलेला पहिला टप्पा-म्हणजेच 'घरसूची आणि गृहगणना' या विषयावर एक सविस्तर चर्चा सादर करणार आहोत. गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या 'भारताचे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त' कार्यालयातील उप-रजिस्ट्रार जनरल व्ही.ए. वराडे हे या कार्यक्रमात श्रोत्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आमच्या स्टुडिओमध्ये उपस्थित असतील. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी, आज रात्री 9:30 वाजल्यापासून 011-23310481, किंवा 011-23717117, 011-23717106 किंवा 011-23314444 या क्रमांकांवर फोन करा. तसंच तुम्ही तुमचे प्रश्न WhatsApp द्वारे 9289094044 या क्रमांकावरही पाठवू शकता किंवा #AskAir हा हॅशटॅग वापरून 'X' या समाजमाध्यमावर तुमचे प्रश्न पोस्ट करू शकता.

**हिंदकेसरी**

महाराष्ट्रातल्या सातारा इथं आयोजित 52 व्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेची अंतिम लढत काल पार पडली. महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ आणि 3 वेळचा उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड यांच्यात काल रात्री भारतीय शैली प्रकारात झालेल्या लढतीत हिंदकेसरीची गदा महेंद्र गायकवाड यांनी मिळवली. पहिल्याच भिडतीत पृथ्वीराज मोहोळ यांच्या हातास दुखापत झाली. यानंतर झालेल्या दुसऱ्या टकरीत महेंद्र गायकवाड यांना विजयी घोषित करण्यात आलं.तत्पूर्वी महिला गटात हिंदकेसरी किताबासाठी हरियाणाची काजल धोंजक आणि दिल्लीची खुशी दलाल यांच्यात लढत झाली. त्यामध्ये महिला हिंदकेसरीचा किताब काजल धोंजक हिनं पटकावला. वाशीम इथं 30 आणि 31 मे रोजी होणाऱ्या भारतीय कुस्ती शैलीच्या माती प्रकारातील महिला महाराष्ट्र केसरीच्या चिन्हाचंही यावेळी अनावरण करण्यात आलं.

**भारोत्तोलन**

गांधीनगर इथं पार पडलेल्या 2026 च्या आशियाई भारोत्तोलन विजेतेपद स्पर्धेत भारतानं 10 पदकं पटकावली. यामध्ये एक रौप्य आणि नऊ कास्य पदकांचा समावेश आहे. यापूर्वीच्या जियांगशान इथं पार पडलेल्या स्पर्धेच्या तुलनेत यंदा भारताच्या कामगिरीत सुधारणा झाली आहे. मागील वर्षी या स्पर्धेत भारताला एकही पदक मिळवता आलं नव्हतं. राष्ट्रकूल स्पर्धेतील कास्यपदक विजेता लव्हप्रीत सिंग यानं स्पर्धेच्या अंतिम दिवशी 110 किलोच्या वरील गटात 386 किलो वजन उचलून पाचवं स्थान मिळवत वैयक्तिक तसंच भारतासाठीही सर्वोत्तम कामगिरी नोंदवली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार